राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६११९ ते ६१२३/२०२६

श्री. जनार्दन बन्सी बोदरे
मु.पो.पंतनगर, ता.मलकापुर, जिल्हा-बुलढाणा.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी,
जय भोलेनाथ को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड,
सागर पार्क, अमृत नगर,
घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०० ०८६.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक,
जय भोलेनाथ को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड,
सागर पार्क, अमृत नगर,
घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०० ०८६.

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>

अपीलकर्ता	:	अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

अपिलार्थीनी दाखल केलेल्या **अपील क्रमांक ६११९ ते ६१२३** यामध्ये **जोडपत्र अ** हे जन माहिती अधिकारी जय भोलेनाथ कॉ.ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, सागर पार्क, अमृत नगर, घाटकोपर यांचेकडे दाखल केले असून यावर दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी माहिती प्राप्त झाली नसल्याने प्रथम अपील अर्ज दाखल केला व त्यानंतर दिनांक ११ जुलै, २०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आढळून येतो.

अपिलार्थीचे **जोडपत्र अ** प्राप्त झाल्यानंतर जय भोलेनाथ कॉ.ऑपरेटिव्ह सोसायटी मार्फत दिनांक ०१ एप्रिल, २०२२ रोजी अपिलार्थीना उत्तर देण्यात आले असून **माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (ज)** अन्वये सहकारी संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण नसल्याचा प्रतिसाद देण्यात आला असून यामध्ये शासनाची मालकी असलेली किंवा शासकीय निधीद्वारे त्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो अशी संघटना किंवा शासकीय संघटना यातील कुठल्याही प्रकारात जय भोलेनाथ सोसायटी मोडत नसून अपिलार्थीनी संबंधित सहकारी संस्थेकडून कर्ज प्राप्त केले असल्याने दाखल केलेल्या उपरोक्त माहिती अर्जावर प्रतिसाद देणे हे माहितीचा अधिकार कायद्याखाली बंधनकारक नसल्याचे तसेच

अपिलार्थीनी यांनी त्यांच्या ऑटोरिक्षा नंबर MH-03- BY-8029 यातील कर्ज परतफेड न केल्यामुळे या संदर्भातील निवाडा होणे हा दाखल केला असल्याचे यात नमूद केलेले आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, संस्थेतर्फे श्री.गणेश प्रसाद मौर्य, मनीषा जाधव व अजित कुमार यादव असे संस्थेचे पदाधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी दाखल केलेले **जोडपत्र अ, ब व द्वितीय अपील अर्ज** हे संपूर्णतः **माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (ज)** यामधील तरतूदिशी विसंगत असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत पाचही द्वितीय अपील अर्ज गुणवत्ताहीन असून फेटाळण्यात येत आहेत.

संबंधित संस्थेने दाखल केलेल्या लेखी उत्तरात माननीय सर्वोच्च न्यायालय यांची फलप्पम कॉपरेटिव्ह बँक लिमिटेड विरुद्ध केरळ राज्य आणि मा.मुंबई उच्च न्यायालय यांच्या नागपूर खंडपीठाची राजेश्वर मजूर सहकारी संस्था या दोन्हीही निर्णयांचा हवाला देण्यात आला असून या संस्थेला माहितीचा अधिकार कायदा त्यातील तरतुदी लागू होत नसल्याबाबत पुर्नरुच्चार केलेला आहे.

प्रथम दर्शनी अपिलार्थीनी केलेला मौखिक युक्तिवाद तसेच लेखी निवेदन हे माहितीचा अधिकार अधिनियमाशी सुसंगत असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीनी दाखल केलेले पाचही माहिती अर्ज हे गुणवत्ताहीन असल्याने फेटाळण्यात येत आहेत.

आदेश

अपिल क्र. ६११९ ते ६१२३/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १५-०७-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**